RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१०-११/२५३
आरपीसीडी.सीओ.एफआयडी.बीसी.क्र./१२.०१.०१२/२०१०-११

नोव्हेंबर १, २०१०

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
(प्रादेशिक ग्रामिण बँकांसह)

महोदय,

**इंदिरा गांधी राष्ट्रीय उतारवय पेन्शन योजना (आयजीएनओएपीएस)च्या लाभार्थींची खाती उघडणे व चालविणे.**

भारत सरकारने सांगितले आहे की, वयस्क व्यक्तींवरील धोरणावरील समितीने तिच्या ४थ्या पुनरावलोकनात, वयस्क व्यक्तींना लाभदायक धोरण बनविण्याच्या गरजेवर आणि लोकसंख्येमधील ह्या विभागाला पुरेसे स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी ठोस पाउले उचलण्यावर भर दिला आहे. ह्या समितीचा एक निर्णय, असा होता की, इंदिरा गांधी राष्ट्रीय उतारवय पेन्शन योजनेच्या लाभार्थींच्या बँकखात्यांमध्ये पैसे थेट हस्तांतरित केले जावेत.

२) त्यानुसार, आपणास कळविण्यात येत आहे की, आयजीएनओएपीएसच्या लाभार्थींच्या खात्यात पैसे थेट हस्तांतरित करण्यास भारत सरकारला मदत व्हावी ह्यासाठी, अशा लाभार्थींची खाती उघडण्यास मदत करण्यासाठी आपल्या शाखांना सूचना द्याव्यात.

आपली,
(डॉ. दीपाली पंत जोशी)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

ग्रामिण योजना व कर्ज विभाग, केंद्रीय कार्यालय, १०वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत, पो.बॉ.क्र.१००१४ मुंबई ४००००१
टेलि.क्र. ९१-२२-२२६०१०००/फेक्स -९१-२२-२२६२१०११/२२६५८२७३/२२६५८२७६ ई-मेल - cgmicrpcd@rbi.org.in